copy

मुंबई नागरी सेवा नियम ६०९ अन्वये
विशेष जादा वेतन मंजूर करण्याचे
प्रदान केलेले अधिकार.

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
परिपत्रक क्र.एसपीव्हाय.११७९-२२९१(१४६१)-ई-१
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२ दिनांक १ फेब्रुवारी १९८०

प रि प त्र क

शासन निर्णय, वित्त विभागाच्या क्र.पीएमाय.१२७९-सीआर-९९२-एसईआर-२, दिनांक २९ मे १९७९ अन्वये त्या निर्णयाच्या परिच्छेद १ मधील अटी पूर्ण होत असतील तर उपजिल्हाधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांना मुंबई नागरी सेवा नियम ६०९ अन्वये १२० दिवसापर्यन्त अतिरिक्त कार्यभार धारण केलेल्या कालावधीसाठी विशेष वेतन मंजूर करण्याचे अधिकार आयुक्तांना प्रदान झाले आहेत. जर अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी २९-५-७९ पूर्वीचा परंतु १६-११-७८ या नंतरचा असेल तर आयुक्त अशा प्रकरणात वरील दिनांक २९-५-७९ च्या आदेशानुसार प्रदान करण्यात आलेल्या शक्तीनुसार विशेष वेतन मंजूर करु शकतात अगर कसे असा मुद्दा उपस्थित झाल्या-वरुन असे स्पष्ट करण्यात येत आहे की, दिनांक २९-५-७९ चे आदेश हे शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पीओवाय-१२७७-सीआर-९९२-एसईआर-२, दिनांक १६-११-७८ च्या आदेशात दुरुस्ती करुन काढलेले असल्याने जर अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी दिनांक १६-११-७८ नंतरचा असेल तर अशा सर्व प्रकरणात आयुक्त वरील दिनांक २९-५-७९ चे आदेशान्वये प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करुन विशेष वेतन देण्यास मंजुरी देऊ शकतात.

645/12

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(श्रीमती मा.मो.मोहो)
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग.

OFFICE OF THE COLLECTOR
RATNAGIRI
Date 4 FEB 1980
Branch EST

प्रति

सर्व आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
महालेखापाल, महाराष्ट्र(१), मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र(२), नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

K.W 80 file